श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org
श्री सिध्दिविनायक

# Nit Document

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.

महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणारे
बेसन खरेदीसाठी ई–निविदा मागविण्याबाबत.

बेसन पुरवठा कालावधी
एप्रिल, २०२६ ते दिनांक ३१ मार्च, २०२७ पर्यंत

ई–निविदा सूचना :

मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारे महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणारे बेसन खरेदीसाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| ई–निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | –: | मंगळवार दि. १७ फेब्रुवारी, २०२६ |
| ई–निविदापुर्व बैठक वार व दिनांक (बेसन) | –: | शुक्रवार दि. २० फेब्रुवारी,२०२६ दु. २ वा. |
| कच्चा माल नमुना तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | –: | शनिवार दि. २८ फेब्रुवारी,२०२६ सायं. ६ वा. |
| ई–निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | –: | मंगळवार दि. १० मार्च, २०२६ सायं. ५.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ (बेसन) | –: | सोमवार दि. १६ मार्च, २०२६ दुपारी २.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ (बेसन) | –: | बुधवार दि. १८ मार्च, २०२६ दुपारी ३.०० वा |
| स्थळ | –: | श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, तिसरा मजला, न्यास कार्यालय, |

सही/–
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## महाप्रसाद बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल "बेसन" खरेदीची ई–निविदा मागविण्याबाबत.

कच्चा माल पुरवठा कालावधी एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत.


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सुचना, वार, दिनांक, वेळ | २ |
| २ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे व न्यासास सादर करावयाची कागदपत्रे | ३ |
| ३ | निविदेची किंमत/शुल्क, बयाणा रक्कम, पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती | ४ |
| ४ | बेसनाचे मापदंड तथा वैशिष्टये (Specification) Grade Specification (Quality) | ५ |
| ५ | निविदाधारकाबाबतची माहिती | ६ |
| ६ | हमीपत्र | ७ |
| ७ | मागिल ३ वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापालांचे प्रमाणपत्र | ८ |
| ८ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) मुळ निविदेचा तपशील | ९ |
| ९ | निविदा मागविण्याची माहीती | १० ते ११ |
| १० | ई. निविदा अटी व शर्ती | १२ ते १५ |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे व न्यासास सादर करावयाची कागदपत्रे

अ) तांत्रिक कागदपत्रें (**Technical Bid**)

१. निविदेची किंमत / शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत

२. बयाना रक्कम जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत

३. राष्ट्रीयीकृत / अनुसूचित बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate)

४. अद्ययावत कंपनी नोंदणी दाखला / दुकाने नोंदणी दाखला

५. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अद्ययावत प्रमाणपत्र (**Fssai Registration Updated Certificate**)

६. आयकर नोंदणी पॅन कार्ड (**Pan Card**)

७. वस्तु व सेवाकर नोंदणी दाखला (**GST Registration**)

८. मागील ३ वर्षाचा (आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ ) आयकर आणि सेवाकर विवरणपत्र (**IT & GST Returns**)

९. आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असणारे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र
टिप – ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल २,८०,००,०००/–पेक्षा जास्त असावी. (म्हणजेच निविदाकाराची प्रति वर्ष आर्थिक उलाढाल किमान २,८०,००,०००/–पेक्षा जास्त असावी.)

१०. बेसन पुरवठा करण्याचा तीन वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे (कार्यादेश/पुरवठा आदेश/देयकाच्या प्रती किंवा तत्सम कागदपत्रे)

११. हमीपत्र

१२. निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत

ब) मूल्य निविदा तांत्रिक निविदेत अपलोड करू नये. ती स्वतंत्रपणे भरण्यात यावी.

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

श्री सिध्दिविनायक

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## निविदा शुल्क व बयाणा रकमेबाबतचे जोडपत्र "अ"

| अ. क्र. | कच्चा माल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजे माल | निविदेची किंमत/शुल्क रु. | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | बेसन | २,२०,००० किलो | १२०००/– | १,२५,०००/– |

टिप : वर नमूद मालाचे प्रमाण हे अंदाजीत आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते

## पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती

| अ. क्र. | कच्चा माल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजे माल | पतदारी दाखला (Solvency certificate) रक्कम (रु.) | मागील ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (इ) |
| १ | बेसन | २,२०,००० किलो | ४३,००,०००/– | २,८०,००,०००/– |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

# बेसन (Gram flour)

## बेसनाचे मापदंड तथा वैशिष्टये विनिर्देश (Specification)

## Grade specifications (quality) of Besan (Gram Flour) under AGMARK.

## (Standard grade)

### A) General Characteristics:

1. A product obtained by milling sound clean and dried ductile gram (Cicer arietinum) only. It shall be yellowish in colour and shall possess characteristics taste and smell.
2. It shall be free from contamination with Khesari Dal (Lathyrus-Sativus)
3. It shall be free from insect and fungal infestation, added colouring matter, grit and preservatives.
4. It shall be free from adulterants impurities and from other extraneous matter including rodent hair, and rodent excreta.
5. 99.3% of a “fine” product shall be passes through the 500 micron I.S. Sieve & shall be fit in all respects for human consumption.
6. Shall exhibit the specified characteristic appearance of cellular structure on microscopic examination.

### B) Special characteristics:

| Sr. No. | Quality Characteristics | Limit |
|---|---|---|
| 1 | Moisture % | 2.5 |
| 2 | Total Ash % by weight (on dry basis) | 3.5 |
| 3 | Ash insoluble in dil. HC1 % (on dry basis) (Max.) | 0.35 |
| 4 | Alcoholic Acidity (as H2SO4) in 90% alcohol by weight. (Max.) | 0.18 |
| 5 | Crude Protein (N x 6.25) (on dry basis) by weight. (min.) | 21.0 |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

mahaprasad@siddhivinayak.org

# निविदाधारकाबाबत माहिती

१) फर्मचे/कंपनीचे नांव :______________________

२) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :______________________

______________________

______________________

३) संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक

अ) ऑफीस :______________________

ब) दुकान :______________________

क) मोबाईल क्रमांक :______________________

ड) फॅक्स क्रमांक :______________________

इ) ई–मेल :______________________

४) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव :______________________

मोबाईल क्रमांक :______________________

५) मालकाचे / भागीदाराची नावे : अ) ______________________

ब) ______________________

६) सेवाकर क्रमांक **(GST No.)** :______________________

७) आयकर नोंदणी पॅन क्रमांक :______________________

# (फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर)

## हमीपत्र

प्रति,
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

महोदया,

मी/आम्ही ——————————————————————————————

खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार महाप्रसाद विभागासाठी लागणारा कच्चा माल आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर पुरवठा करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये सेवाकर (जी.एस.टी.) वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहीत केल्यानुसार Bank Guarantee देण्यास बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रम यांनी यापूर्वी आमच्या मालाचा पुरवठा करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

दिनांक : / /२०२६

निविदाधारकाची सही व शिक्का

# (सनदी लेखापालाचे लेटरहेडवर)

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ---------------------------------------------------- यांच्या व्यवसायाची वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी ( आर्थिक वर्ष ) | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२२–२३ | |
| २ | वर्ष २०२३–२४ | |
| ३ | वर्ष २०२४–२५ | |
| | | |
| | एकूण उलाढाल | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :– / / २०२६

ठिकाण :–

लेखापरीक्षकाची सही / चार्टर्ड काऊंटंन्ट

(नाव / सही शिक्का)

श्री सिध्दिविनायक

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

दिनांक – / / २०२६

## मुल्य निविदा (वाणिज्यिक–Commercial) बीड ऑफ कोटेशन (BOQ)

निविदेमध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव :————————————————

निविदाधारकाचा कायमचा पत्ता :————————————————

————————————————

निविदाधारकाचा सेवाकर
नोंदणी क्रमांक (GST No.) :————————————————

| अ. क्र. Sr. No. | मालाचे नांव **Goods Name** | नमूद कालावधीतील अंदाजे परिमाण **Approximate Quantity in the specified period** | दर (रू) प्रति किलो (सेवाकर वगळून) **Rate per Kgs (Excluding GST)** | नमूद कालावधीत पुरवठा करावयाच्या मालाचे मुल्य (रू) **Estimated cost of whole supply** |
|---|---|---|---|---|
| (अ) A | (ब) B | (क) C | (ड) D | (इ) E |
| १ | बेसन/ **Gram flour** | २,२०,००० किलो | | |

निविदाधारकाची सही व शिक्का

**उपरोक्त मूल्य निविदेचे प्रारूप केवळ माहितीकरीता सोबत देण्यात आले आहे. मात्र सदरील तक्त्यातील माहिती तांत्रिक निविदेसोबत अपलोड करू नये. ती स्वतंत्रपणे मुल्य निविदेच्या विहित नमुन्यात भरण्यात यावी.**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

# निविदा मागविण्याबाबतची माहिती.

१) निविदा अपलोड करतेवेळी निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कम निविदा कागदपत्रांतील जोडपत्र "अ" प्रमाणे ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रकमेवर व्याज अनुज्ञेय होणार नाही.

२) ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बॅकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी.

४) निविदेसोबत राष्ट्रीयीकृत वा अनुसूचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. पतदारी दाखला तसेच निविदाधारकाची आर्थिक उलाढाल ही पान क्र. ४ वर नमूद केल्याप्रमाणे असावी.

५) निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. अपूर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे त्याबद्दलची कारणे देणे न्यासावर बंधनकारक राहणार नाही.

६) निविदाधारकास एक किंवा अनेक मालाच्या पुरवठयाकरीता निविदा सादर करता येतील. तथापि प्रत्येक मालासाठी विहित केलेली जोडपत्र 'अ' मधील बयाना रक्कम ही त्यासाठी अदा करावी लागेल. **मुल्य निविदेतील दर हे कर वगळून असावेत.**

७) न्यासास पुरवठा करावयाचा कच्चा माल व प्रयोगशाळा तपासणीसाठी सादर करावयाचा कच्चा माल FSSAI standards अथवा न्यासाने दिलेल्या विनिर्देशानुसारच (Specification) असावा. तांत्रिक निविदेत नमुद निकषाची पुर्तता करणारा ई निविदाकार तांत्रिक निविदेत पात्र ठरल्यानंतर प्रयोगशाळा तपासणी अहवालाच्या निकषावर पात्र ठरत असल्यासच अशा निविदाकाराची मुल्य निविदा उघडण्यात येईल. अशी कार्यवाही करताना कच्च्या मालाच्या गुणवत्तेचा, प्रयोगशाळा तपासणी अहवालाचा विशेषत विचार करण्यात येईल. केवळ न्युनतम दर प्राप्त झाला म्हणून निविदा स्विकारण्याचे बंधन न्यासास/समितीस असणार नाही.

८) निविदेमध्ये नमूद कच्च्या मालाचा नमूना ५०० ग्रॅम बरणीत भरून दि. २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतीक्षालय इमारतीतील तळमजल्यावरील टपाल कक्षात जमा करणे आवश्यक राहील. निविदाकाराने तपासणीसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम ११३०/– भरून त्याची पोच घ्यावी.

तपासणीसाठी कच्च्या मालाचे नमूने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ नंतर सादर करणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदर नमून्यावर निविदाकाराने खालीलप्रमाणे माहिती भरून चिकटवणे आवश्यक राहील.

निविदाकाराचे नाव –:

नमून्याचे नाव –:

नमून्याचे प्रमाण –: ५०० ग्रॅम (बरणीमध्ये)

सादर केल्याचा दिनांक –:

वेळ–:

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## अटी व शर्ती

१) कच्चा मालाच्या पुरवठयाचा कालावधी हा कार्यादेशाच्या दिनांक पासून ते ३१ मार्च २०२६ अखेर पर्यंत वैध राहील. तथापि, कार्यदेशाचा कालावधी संपल्यानंतर पुढील वर्षाकरीता कच्चा मालाच्या पुरवठयासाठी निविदा प्रक्रियेद्वारा नवीन निविदाकाराची नेमणूक होईपर्यंत वा त्याने मालाचा पुरवठा सुरु करेपर्यंत पुरवठादारांस वरील कालावधीसाठी विहीत केलेल्या दरातच मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील व त्याकरीता कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. तसेच कालावधीबाबतचा न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

२) निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाकाराने पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा करावयाच्या एकूण मालाच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कमेंची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करणे बंधनकारक आहे. न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम वजा करुन उर्वरीत रकमेकरीता बॅक गॅरेंटी स्विकारण्यात येईल. बॅक गॅरेंटी राष्ट्रीयीकृत वा अनुसूचित बॅकेची असणे आवश्यक आहे

३) बेसन परिमाण हे ५० किलोच्या प्लास्टीक/बारदान पिशवी मध्ये असणे आवश्यक आहे.

४) ई निविदाधारकास धार्मिक स्थळे, नामांकित कंपन्या, उपहारगृहे, शासकीय विभाग/ कार्यालये अशा स्वरूपाच्या ठिकाणी बेसन पुरवठा करण्याच्या कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.

५) न्यासाच्या खरेदी विभागाच्या आदेशाप्रमाणे वेळोवेळी माल पुरवावा लागेल. आवश्यकतेनुसार दरमहा अथवा कमी जास्त मुदतीत मालाची मागणी केली जाईल. एकदम सर्व माल घेतला जाणार नाही. मागणीनुसार माल स्विकारला जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेला माल स्विकारला जाणार नाही. मालाचे परिमाण अंदाजे असल्याने, प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

६) निविदाकाराने मालाची पोहोच स्वखर्चाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे न्यासाचे खरेदी विभागाच्या गोडाऊनमध्ये पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून मालाच्या वाहतुकीचा व वाराईचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. माल खरेदी विभागाच्या गोडाऊन शिवाय इतरत्र उतरवू नये. असे केल्यास माल गोडाऊनमध्ये पोहचविण्याचे लेबर चार्जेस बिलातून कपात करण्यात येईल.

७) निविदेमध्ये नमूद केलेल्या वार्षिक परिमाणापेक्षा जादा मालाची मागणी न्यासाकडून झाल्यास मालाचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे बंधनकारक राहील.

८) न्यासाला पुरविण्याचा माल हा न्यासाने विनिर्देश (Specification) केल्यानुसार नमुनाबरहुकूम शुध्द, उत्तम प्रकारचा पुरवावा लागेल. दुय्यम वा कमी दर्जाचा माल किंवा खराब माल स्वीकारला जाणार नाही. अशा मालाचा पुरवठा केल्यास तो स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे निविदाकारावर बंधनकारक राहील.अन्यथा, मालाची नासधूस झाल्यास त्यासाठी न्यास जबाबदार राहणार नाही. खराब मालाची देयके अदा केली जाणार नाहीत.

९) निविदा प्रक्रियेमध्ये स्वीकृत केलेले दर वर्षभरासाठी कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव पुरवठा कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. आपण माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास आपली पूर्णत: किंवा अंशत: बयाना / बॅक गॅरेंटीमधील रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

१०) निविदाकाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून कमालं ७ दिवसात मालाचा पुरवठा करणे आवश्यक असेल. विहीत मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण/नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजारभावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचा माल खरेदी करण्याचे अधिकार/मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रकमेची भरपाई पुरवठादारास करावी लागेल. सदर भरपाई देयकाच्या रकमेतून वा बयाना रकमेतून करण्यात येईल

११) आपणाकडून ज्या बॅच नंबरच्या मालाचा पुरवठा केला जाणार आहे त्या बॅच नंबरच्या नमुन्याची एन.बी.एल प्रमाणित प्रयोगशाळेकडून तपासणी करून त्याचा अहवाल पुरवठा मालासोबत करणे बंधनकारक असेल प्रमाणित तपासणी अहवालासोबतच पुरवठा माल स्विकारला जाईल. याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१२) न्यासास पुरवठा केलेल्या मालाची न्यासाकडूनही अनपेक्षितपणे प्रयोगशाळा तपासणी करण्यात येईल. सदर तपासणी बृहनमुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाकडील प्रयोगशाळेतून अथवा अन्न व औषध प्रशासनाने प्रांधिकृत केलेल्या प्रयोगशाळेतून करणेत येईल. त्याकरीता होणारा खर्च आपण सादर केलेल्या देयकातून वजा करुन देयक अदा करण्यात येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. FSSAI Standards किंवा निविदेतील Specification नुसार मालाची पूर्तता करावी लागेल. दिलेला माल FSSAI Standards किंवा निविदेतील Specification नुसार नसल्यास अश्या पुरवठा केलेल्या मालासंदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(१३) विहित कालावधीत मालाचा पुरवठा न केल्यास अन्य पुरवठादाराकडून अथवा बाजारभावाने माल मागविण्याची मुभा न्यासास राहील. अशा प्रकरणी अट क्र. १० नुसार कारवाई करण्यात येईल.

(१४) पुरवठादाराने सदोष माल उपलब्ध केल्यास पुरवठादाराचा करार तात्काळ रदद् करून नव्याने ई–निविदा प्रक्रिया करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीस राहील. या विरोधात कुठल्याही लवादा समोर दाद मागतायेणार नाही. सदर पुरवठादारांची **(EMD)** बयाना रक्कम जप्त करून पुरवठादारास काळया यादीत अंतर्भुत करण्यात येईल.

१५) देयकामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित नियमानुसार आयकर कपात केली जाईल. देयक सादर करतांना देयकात, खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचे नावाचा पुरवठा करणेत आलेल्या मालाची तपासणी करून, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१६) मालाचा पुरवठा आदेश व देयकाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाचे न्याय संवाद कक्षेत राहील.

१७) कार्यादेशाच्या दिनांकापासुन एका महिन्याच्या आत समक्ष येवून स्टॅम्पपेपरवर करारनामाचे प्रारूप न्यासास सादर करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग म्हणून ग्राहय धरण्यात येतील. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही.

१८) बयाना रक्कम/बॅक गॅरेंटी माल पुरवठा करार संपल्यावर ९० दिवसानंतर परत केली जाईल. बयाना रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१९) आपात्कालीन परिस्थितीत ई–निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

२०) निविदाधारक हा हिंदू असावा.

२१) माल पाठविताना रविवार व मंगळवार खेरीज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता पाठविण्याची दक्षता घेणे आवश्यक असेल. रविवार व मंगळवार या दिवशी माल उतरवून घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. न्यासाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत माल उतरविण्यात यावा. परस्पर माल उतरवून दिल्यास सदर मालाच्या हिशोबाची व प्रदानाची जबाबदारी न्यासावर राहणार नाही.

२२) ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बधनकारक असेल. निविदाधारकांच्या ऑनलाईन कागदपत्रांच्या पुर्ततेसंबधात तांत्रिक निविदेमध्ये अनावधानाने कागदपत्राची पुर्तता राहिल्यास सदरील कागदपत्रे तांत्रिक निविदा उघडताना समितीच्या उपस्थितीत त्यांच्या मान्यतेने निविदाधारकाच्या पात्रतेकरीता ग्राहय धरण्यात येईल.

२३) कंत्राटदारास कोणत्याही संस्थेमध्ये सदरील कामाच्या अनुषंगाने त्यांना काळ्यायादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्या विरुद्ध न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही वा प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२४) निविदापुर्व बैठकीस निविदाकार अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहील याची काळजी घ्यावी. यासंदर्भात खालील नमूद क्रमांकावर संपर्क साधावा. निविदेच्या अनुषंगाने निविदाकारास कोणत्याही आवश्यक माहीती साठी खालील क्रमांकावर संपर्क करावा.

२५) उपरोक्त शर्ती व् अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाकाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

| | |
|---|---|
| **श्रीमती वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी** | ९९३०९४२४२८ |
| **डॉ.संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी** | ७९७७७५३७१६ |
| **श्री. मंगेश कुंटे, पर्यवेक्षक** | ९७०२०२०३४२ |

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी